**गोबरगॅसच्या यशस्वी वाटचालीची कहाणी: परसबाग ते सेंद्रिय शेतीचा प्रवास**

शेती हा आपल्या भारतीय समाजाचा आत्मा आहे. लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह त्यावरच आधारित आहे. पण, हल्लीच्या काळात शेती व शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. नैसर्गिक आपत्ती, रासायनिक खतांचा अति वापर, पाणीटंचाई आणि बदलते हवामान यामुळे शेती व शेतकऱ्यांची स्थिती खूपच बिकट बनली आहे. उत्पादन कमी झाले, उत्पादन खर्च त्या मनाने वाढला शिवाय कृषि उत्पादनाला बाजार भाव कमी अशा परिस्थितीत टिकून राहण्यासाठी नव्या उपायांची आवश्यकता आहे.

तेच आम्ही, युवा रूरल असोशिएशन म्हणून करीत आहोत. त्यातली एक कहाणी आज आपल्यासमोर मांडत आहोत. जी तुमच्या मनाला स्पर्श करून, तुमच्यातील संवेदनशीलतेला जागृत करेल.

**सोना अनिल बटले (बदललेले नाव) यांची प्रेरणादायक कथा**

या कहाणीतून आपल्याला शिकण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील डोंगारला गावातील सोना अनिल बटले यांची गोष्ट आहे. सोना यांचे कुटुंब चार एकर कोरडवाहू शेती आणि तीन गाई व दोन बैल यांच्या आधारावर आपले जीवन जगत होते. मात्र, त्यांना दरवर्षी पिकांच्या उत्पादनात घट होत गेल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. रासायनिक खतांचा अति वापर, वृक्षतोड, अवकाळी पाऊस आणि गारपीट या सर्व गोष्टींमुळे शेती करणे अवघड होऊन गेले होते. त्यावर उपाय शोधण्यासाठी त्यांनी धाडसाने एक पाऊल पुढे टाकले.

एक दिवस सोना आपल्या शेजारी असलेल्या एका नातेवाईकांकडे गेलेल्या होत्या. तिथे त्यांनी गोबरगॅस बसवलेले पाहिले. त्याबद्दल विचारणा केली असता युवा रुरल असोसिएशन संस्थे बद्दल त्यांना कळले. आणि सोना यांच्या या प्रवासात युवा रूरल असोसिएशन (YRA) ने महत्त्वाची भूमिका बजावली. YRA ने त्यांना गोबरगॅसच्या उपयुक्ततेची सविस्तर माहिती दिली आणि हा प्रकल्प त्यांच्या घरी राबवण्यासाठी मार्गदर्शन केलं. त्यांनी गोबरगॅसचा उपयोग फक्त स्वयंपाकापुरता मर्यादित न ठेवता, त्याचं सेंद्रिय शेतीसाठी होणाऱ्या फायद्याचं महत्वही समजावून सांगितलं. YRA च्या मदतीने सोनांनी आपल्या घरी गोबरगॅस बसवला. त्याचा सकारात्मक परिणाम लगेच जाणवू लागला. सिलेंडरवरील वार्षिक खर्च वाचल्याने मुलांच्या शिक्षणावर अधिक खर्च करता आला. गोबरगॅसच्या स्लरीचा उपयोग त्यांनी परसबागेत सेंद्रिय खतासाठी केला. त्यामुळे भाजीपाला अधिक दाट आणि चांगल्या दर्जाचा तयार होऊ लागला. शेतीतही उत्पादन वाढलं, ज्यामुळे आर्थिक भार कमी झाला.

**गोबरगॅस: एक नवे आयुष्य, एक नवा बदल**

गोबरगॅस बसविल्यानंतर सोना यांच्या कुटुंबाचे जीवनच बदलून गेले. स्वयंपाकाच्या वेळेत मोठी बचत झाली, आणि त्यांचा वेळ व श्रम इतर महत्वाच्या कामांसाठी वापरण्याची संधी मिळाली. सिलेंडरचा खर्च सुमारे १०,००० प्रती वर्ष वाचला घरातील वातावरणही सुधारलं.

गोबरगॅस फक्त आर्थिक दृष्टिकोनातूनच लाभकारी ठरला नाही, तर तो सामाजिकदृष्ट्या देखील महत्वाचा ठरला. सोना यांच्या कुटुंबाला आत्मनिर्भरतेचा अनुभव आला. त्यांनी यावर विश्वास ठेवला आणि इतर लोकांमध्ये गोबरगॅस आणि सेंद्रिय शेतीचा प्रचार करण्यास सुरूवात केली.

**युवा रुरल असोसिएशन: गावांमध्ये बदल घडवण्याचा आवाज**

सोना यांना आशेची एक नवी किरण दिसली, आणि ती होती *युवा रुरल असोसिएशन* (YRA). या संघटनेच्या माध्यमातून अनेक गावांमध्ये गोबरगॅसच्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली जात आहे. YRA चे कार्य हे

फक्त आर्थिक मदतीच्या दृष्टीने नाही, तर ते सामाजिक आणि पर्यावरणीय बदल घडवण्यासाठीदेखील आहे.
गोबरगॅसच्या मदतीने गावांमध्ये आर्थिक, सामाजिक आणि पर्यावरणीय सुधारणा शक्य होऊ शकतात. आणि यासाठी आपल्या मदतीची गरज आहे. आपली छोटीशी मदत, आपले योगदान या उपक्रमाला नवी दिशा देऊ शकते. आपली देणगी यासारख्या उपक्रमांना गती देईल, आणि अनेक कुटुंबांना स्थिर आणि सेंद्रिय जीवनशैली कडे नेईल.
**"आपलं योगदान, एक नवा बदल!"**

*युवा रुरल असोसिएशन, नागपूर* यांच्या माध्यमातून हे सर्व शक्य होईल. आम्ही तुम्हाला आवाहन करत आहोत की, तुम्ही या उपक्रमात सहभागी व्हा. तुमच्या मदतीमुळे या बदलाचा मार्ग सुकर होईल.
तुमचा छोटासा हातभार असलेल्या देणगीमुळे आपल्याला ग्रामीण भागात मोठा सकारात्मक बदल घडवता येईल.

**देणगीसाठी संपर्क:** *युवा रुरल असोसिएशन, नागपूर*

*वेबसाइट:* www.yraindia.org

आपल्या देणगीमुळे, एक छोटा पण महत्त्वाचा बदल घडू शकतो. चला, एका स्वच्छ, सुरक्षित आणि आत्मनिर्भर समाजाच्या दिशेने एकत्रित पाऊल टाकूया!